# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

१० फेब्रुवारी, २०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०९/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशा, दुर्गापुर, ब्रम्हपुरी, चिमुर, तळोधी, मुल, सिंदेवाही, राजुरा, विरुर, पाटण** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१३** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०५ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **१,१०,३००/–रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

## चंद्रपर पोलीसांची जुगार खेळणाऱ्यांवर कार्यवाही

**१)पोलीस स्टेशन रामनगर :–**

दिनांक **०८/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **रामनगर** अंतर्गत आरोपी हा ५२ तास पत्त्यावर पैशाची बाजी लावुन खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **रामनगर** येथे अप. क्र. **१५८/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **५४३०/–रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **रामनगर** पोलीस करीत आहे.

**१)पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर :–**

दिनांक **०७/०२/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर** अंतर्गत मौजा रुई येथे आरोपी हा सट्टापट्टी जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **चंद्रपुर शहर** येथे अप. क्र. **१८०/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **६०२१/–रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **चंद्रपुर शहर** पोलीस करीत आहे.

---